प्रेसनोट                                    दि. 20/08/2025

**ॲन्टी करप्शन ब्युरो पुणे घटकाकडून उप अधीक्षक, भूमी अभिलेख, दौंड कार्यालयातील परिरक्षण भूमापक व त्यांचेसोबत काम करणारा खाजगी इसम यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | दौंड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय 26 वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | 1) वैशाली चंद्रकांत धसकटे, वय 49 वर्ष, व्यवसाय - नोकरी पद - परिरक्षण भूमापक, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,दौंड रा. केडगाव स्टेशन ता. दौंड जि.पुणे (वर्ग- 3)<br>2) फय्याज दाऊद शेख, वय - 27, खाजगी इसम सहाय्यक सर्वेयर, उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, दौंड,रा.डी.पानसरे वस्ती, दौंड जि. पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | 15,000/- (पंधरा हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | 14,000/- (चौदा हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | 10,000/- (दहा हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | 11/08/2025 |
| सापळा दिनांक | 20/08/2025 |
| ठिकाण | उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, दौंड. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अविनाश घरबुडे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. 9860687770) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदार हे शेतकरी असून त्यांच्या वडिलोपार्जित जमिनीच्या वाटपाचा दावा दौंड सिविल कोर्टात चालू होता. त्या दाव्यामध्ये कोर्टाने तक्रारदाराच्या सामाईक जमिनीचा हिस्सा ठरवून मा. जिल्हाधिकारी यांना जमिनीचे वाटप करून देण्याबाबत आदेशीत केल्यानंतर तहसीलदार,दौंड यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख,दौंड यांना तक्रारदाराच्या सामाईक जमिनीची मोजणी करून वाटप तक्ता सादर करण्याबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे ते प्रकरण उपअधीक्षक भूमी अभिलेख,दौंड यांच्याकडे आल्यानंतर तक्रारदाराच्या सामाईक जमिनीची मोजणी यातील आरोपी लोकसेवक क्र 1 यांनी केली होती.

तक्रारदाराच्या सामाईक जमिनीची केलेल्या मोजणीचा अहवाल आणि वाटप तक्ता तयार करून उप अधीक्षक,भूमि अभिलेख दौंड यांचे सही घेऊन तो प्रस्ताव तहसीलदार, दौंड यांना सादर करण्याकरता व तक्रारदारास 'क' प्रत देण्याकरिता यातील आरोपी लोकसेविका श्रीमती धसकटे यांनी तक्रारदाराकडे 15,000 रुपयांची लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी दि.4/08/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे यांच्याकडे केली होती.

तक्रारदाराच्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने दि.11/08/2025 रोजी पडताळणी कारवाई केली असता आ.लो.से.क्र.1 श्रीमती धसकटे यांनी पंचासमक्ष तक्रारदाराकडे त्यांचे वरीलप्रमाणे काम करून देण्यासाठी सुरुवातीस 15,000/- रुपयांची लाच मागून तडजोडीअंती 14,000/- रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.

वरीलप्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर आज दिनांक 20/08/2025 रोजी सापळा कारवाई दरम्यान आ.लो.से क्र.1 लोकसेविका श्रीमती धसकटे यांचे सांगण्यावरून आरोपी क्र. 2 यांनी तक्रारदाराकडून त्यांच्या वरीलप्रमाणे कामासाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख, दौंड यांच्या कार्यालयाच्या आवारात 10,000/- रुपयांची लाच स्विकारली असता दोन्ही आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले आहे. वरील दोन्ही आरोपी लोकसेवक यांच्याविरुद्ध दौंड पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण या ठिकाणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.**

**लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यातीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823137154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.**

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - 020 - 26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

20/8/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे